अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २४/०७/२०२५

## –: **प्रेसनोट** :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २४/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. गणेश संभाजी कदम, स्वच्छता निरीक्षक, आर/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ४०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रु. ३०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मित्राची हॉटेल आस्थापना असून त्यातील किचन रेस्टॉरन्ट हे मागील १ वर्षापासून तक्रारदार चालवित होते. दिनांक २४/०६/२०२५ रोजी आरोग्य विभाग, आर/दक्षिण विभाग, म. न.पा., मुंबई येथील अधिकारी यांनी तक्रारदार यांचे रेस्टॉरन्ट मध्ये येवून तक्रारदार यांच्याकडे हेल्थ लायसन्स व इटिंग हाऊस लायसन्सची मागणी केली. तक्रारदार यांचेकडे नमूद लायसन्स नसल्याने नमूद अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या रेस्टॉरन्ट मधील साहित्य जप्त करून तक्रारदार यांना रेस्टॉरन्ट बंद करण्यास सांगितले. नमूद साहित्य सोडाविणेकामी तक्रारदार हे दिनांक २८/०६/२०२५ रोजी आर/दक्षिण विभाग, मनपा, मुंबई कार्यालयात गेले असता, लोकसेवक श्री. गणेश संभाजी कदम, स्वच्छता निरीक्षक यांनी तक्रारदार यांना रेस्टॉरन्ट चालू ठेवण्यासाठी पुढील ३ महिन्याकरीता रू. ४०,०००/- लाचेची मागणी केली. पैसे न दिल्यास लोकसेवक व मॅडम रेस्टॉरन्ट चालवू देणार नाही, असे सांगितले. परंतु तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०१/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज केला होता.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक गणेश संभाजी कदम यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. ४०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २३/०७/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक गणेश संभाजी कदम यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. ३०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. नितीन थोरात, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. संतोष गुर्जर, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net